# प्रकरण दुसरे

## 'बनगरवाडी'ची आशयसूत्रे आणि प्रादेशिक वैशिष्ट्ये

## प्रकरण दुसरे

## "बनगरवाडी"ची आशयसूत्रे आणि प्रादेशिक वैशिष्टये"

### १) बनगरवाडीची आशयसूत्रे:

मराठीतील पारंपारिक कादंबरीपेक्षा "बनगरवाडी" ही कादंबरी वेगळी आहे. कारण पारंपारिक कादंबरीमध्ये सामान्यत: एकच एक आशयसूत्र असते. त्या सूत्राभोवती कादंबरीतील पात्रे फिरत राहतात. व लेखक आपल्याला जे समाज-मनावर बिंबवायचे आहे त्या तत्त्वासाठी आपल्या कादंबरीतील नायक-नायिका व इतर पात्रे यांची फरपट करीत असतो. अशा वेळी पात्रांच्या स्वभावाचा विचारसुध्दा लेखक करीत नाही. त्यामुळे नायक-नायिका यांचा प्रेमसंवाद, वा तिरस्कार, तिरस्कारातून पुढे प्रेम व या प्रेमात खलनायकाद्वारे संकट व शेवटी गोड शेवट असे एखादे सूत्र ठेवून संपूर्ण कादंबरीभर रोमँटिक वातावरण ठेवून नायकाचा विजय दाखविणे अथवा नायक-नायिका यांचे मीलन. अथवा एखादे वेळी दोन जीवलग मित्रांची कथा, किंवा मैत्रिणीची कथा रंगवून कादंबरीचे एकच सूत्र फिरत ठेवण्याचे काम आजवरच्या मराठीतील बहुतेक लेखकांनी केले आहे. हे फडके-प्रणीत सूत्र नंतरच्या प्रादेशिक कादंबरीच्या काळातही श्री.ना. पेंडसे, र.वा. दिघे, गो. नी. दांडेकर यांनीही चालू ठेवले. (उदा. 'एल्गार,' हद्दपार,' गारंबीचा बापू,' सराई) तेच सूत्र पुढे ठोकळांच्या गावगुंडमध्ये दिसते. "एल्गार"मध्ये रघुनाथ बेंद्रे व कादर या जीवलग मित्रांच्या प्रेमाची कहाणी आहे, तर "हद्दपार" मध्ये राजेमास्तरांची असामान्यता पेंडसे वर्णन करतात. "गारंबीचा बापू" मधला "अफाट" बापू व राधाची प्रेम कहाणी, तर "सराई" मध्ये लाडी, मनोहरची प्रेमकथा, तर "गावगुंड" मध्ये ग.ल. ठोकळ पारु आणि अमवंत यांची प्रेम कहाणीच सांगितली आहे. सारांश, एखादा विषय मग तो प्रेमाचा असो वा वैफल्याचा असो तो घेऊन केलेले चित्रण व तेही प्रेमचित्रण रंगविण्याचे फडकेप्रणीत तंत्र आजवर

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

हाताळले गेले. प्रेमाशिवाय इतर अनेक विषय आहेत. हे जणू यांच्या गावीही नव्हते. वास्तविक पहाता "प्रेम" या विषयाला खेडयात फारसे महत्त्व नसते. कारण एकमेकांशी प्रेमाप्रेमाने वागणे हे खेडयात महत्त्वाचे असते. व पोट-पाठी लागलेल्या राबणाऱ्या माणसाला प्रेम करीत बसायला वेळ तर कुठे असतो! हे शहरी चोचले खेडयात मुळातच नसतात.

मात्र "बनगरवाडी"त असा कोणताही प्रकार माडगूळकरांनी केलेला नाही. "बनगरवाडी" या कादंबरीची आशयसूत्रे तिच्या प्रादेशिकतेच्या वैशिष्टयातूनच निर्माण होतात. या प्रकारचे चित्रण कादंबरीकाराने केले आहे. या कादंबरीत रूढ अर्थाने नायक-नायिका नाहीत, वा कथानकही नाही. संपूर्ण भूमीचा पट्टाच इथे नायक झालेला आहे. या बनगरवाडीत चित्तथरारक घटना नाहीत की, प्रणयकूजन नाही, की भावनाउद्दीपनासाठी निसर्गवर्णने नाहीत. एवढेच नव्हे आदर्श गांधीवादी शिक्षक रेखाटण्याचा मोह ही पडला नाही. ही एका पुरूषाची वा स्त्रीपुरूषाची अथवा कर्तृत्वाची कथा नाही. तर ती एका वाडीची--- धनगरांच्या वस्तीची कथा आहे. धनगरांचा व्यवसाय करणाऱ्या लोकांची ही वाडी आहे. इथले जीवन निसर्गाच्या तालावर फुलते, फळते वा उध्वस्त बनते. त्यामुळे धनगरांच्या जीवनात जे चढउतार निर्माण होतात ते या निसर्गाच्या लहरीपणावर, इथे निसर्ग त्याच्या रंगरूप गंधासह येतो. निसर्गातील फुलारलेपण, सुगी आणि धनगरी जीवनातील आनंद यांचा अन्योन्य संबंध आहे. पिकाचा पिकलेपणा धनगरांना, जनावरांना पक्षांना गोलगरगरीत करतो. धनगरंगही नाचतात तेव्हा "बनगरवाडी" नाचू लागते. सुगी संपताच पाखरे पांगतात, तसे धनगरही निवांत बसतात. दुष्काळ येतो. "बनगरवाडी"तील धनगर "वाडी" सोडून पोट भरण्यास मैलांना घेऊन जातात. "बनगरवाडी" ओसाड बनते हेच चित्रण लेखकाला करायचे आहे. व ते करण्यासाठी अपरिहार्यपणे प्रादेशिक वैशिष्टये

येऊ लागतात. मुळात ही वाडी नव्याने वसलेली एक वस्ती आहे. इथे मूळची परंपरा, संस्कृती काही नाही. आता कुठे इथे परंपरा मूळ धरू लागली आहे. अशा वाडीची कथा सांगायची आहे या दृष्टीकोणांतून इथली कथावस्तू व व्यक्तिचित्रणे निर्माण केली आहेत. व ती निर्माण करताना अनेक आशयसूत्रे माडगूळकरांनी वापरली आहेत., तसेच कथानकाच्या बाबतीतही पारंपरिक उत्कंठवर्धक विस्मयदर्शक इ. कल्पना माडगूळकरांनी स्वीकारली नाही तर ग्रामीण जीवनाचे वास्तवचित्रण करण्याच्या दृष्टीने व्यक्तिरेखा निर्माण करून त्याच्या अनुरोधाने घटना, प्रसंगाचे चित्रण केले. प्रस्तुत कादंबरीचे कथानक घडविले असे आढळून येते. हे चित्रण करताना रंजकतेपेक्षा प्रादेशिक जीवनाचे वास्तव चित्रण कसे होईल याकडेच माडगूळकरांचा सारा रोख आहे, कथानक रचनेच्या बाबतीत-ही माडगूळकरांनी "बनगरवाडी"च्या रूपाने नवे परिमाण प्राप्त करून दिले असे म्हणावेसे वाटते.

१) पहिले सूत्र असे की, एका वाडीतील शिक्षकाचे जीवन चित्रित करणे हे "बनगरवाडी" कादंबरीतील पहिले आशयसूत्र होय, म्हणून माडगूळकरांनी राजाराम विठ्ठल सौंदणीकर याची शिक्षकाच्या रूपात "बनगरवाडी"त पाठवण केली आहे. " हा शिक्षक केवळ प्राथमिक शिक्षक आहे. त्याची दृष्टी शोधक आहे. आपली कर्मभूमी धनगरांची आहे हे ओळखायला त्याला अवकाश लागत नाही. पाणी आणणाऱ्या काळयाभोर पोरीच्यापायांवरचे पांढरे धोट फरकाटेही त्याला चटकन दिसतात. रिकामटेकडे धनगर शेरडाच्या पायाला घुंगरु बांधून नाचवतात व अशा त-हेने वेळ घालवितात हे त्याने ओळखले आहे. लाव्हा व कबूतर मारून ते धनगर शिकार करतात, अफाट मेंढवाडयातल्या मेंढराच्या माग्यांशी त्यांची पोरे खुळवतात. त्यांची चालणारी उपजतबुध्दि, पावसाळयाच्या आरंभीचे कृमिविश्व

सारे सारे त्याने बिनचूक मनात ठेवले आहे. पेरणीच्या वेळी बायकोला पाभरीला [illegible] जुंपून घरी त्याच बायकोला प्रेमाने, ममतेने तुडवित बसलेला शेकू... आईला मोतेपणी न ओळखणारी मैदयांची पोरे, लोकांच्या डोळयातून ओसंडणारी भूक, सा-याचे मार्मिक अवलोकन करणारी, मास्तरही एक वल्लीच आहे."[१] असे ल.ग. जोग म्हणतात. याचाच अर्थ हा सूक्ष्म अवलोकन करणारा, धनगरांची कामे करणारा, धनगरांचे जीवन न्याहाळणारा शिक्षक या "वाडी"त नव्याने शाळा भरवितो. ज्ञानाबरोबर बलोपासना व्हावी म्हणून गावक-यांच्या साहयाने तालीम बांधतो व काही काळ का होईना या "बनगरवाडी"त चैतन्य निर्माण करतो, "बनगरवाडी"चा कायापालट घडवून आणतो.

मराठी साहित्यात आजवर रेखाटलेल्या रोमँटिक, आदर्शवादी शिक्षकाहून हा शिक्षक आगळा, वेगळा आहे. या मास्तरचे सारे जीवनच बनगरवाडीत बदलून जाते. हा मास्तर म्हणजे गावचा जसा पोष्टमन, तलाठी, न्यायाधीश एवढेच नव्हे तर हरकाम्याची भूमिका ही त्याला बजवावी लागते. मास्तर गावात येताच प्रथम त्याचा "अंडीवाला" म्हणून एक गावकरी उल्लेख करतो. तेव्हा त्याला अपमानास्पद वाटते. पुढे गावात आल्यावर "अंजी" त्याला चोळी शिवून आणण्याची विनंती करते. कुणी त्याला जुने रुपये बदलून आणायला सांगतो, तर कुणी त्याला पोष्टात पत्रे टाकायला सांगतो. कुणी त्याला पेरणीला बैल बघून द्यायला सांगतो. कधी त्याला मैदरांच्या चोरीच्या तक्रारी ऐकाव्या लागतात तर कधी नवराबायकोची भांडणे सोडवायचे काम करावे लागते. कधी त्याला तालीम बांधायची असते तर कधी मुलांना शिकवायचे असते. तर कधी पैसे चोरीला गेल्याने हळहळत बसावे लागते, तर कधी बालटयाकडून दम मिळतो की, पोरे शाळेत आली तर त्यांना शिकव. गावाला शिकवायच्या भानगडीत पडू नकोस. तरीही

तो धनगरांच्या जीवनात समरस होतो. गावावर रामोशी हल्ला करतात तेव्हा गावक-यांच्यावतीने तोच पुढे होतो. सारी "बनगरवाडी" त्याच्या मागे येते. शेवटी बदली झाल्याने व उध्वस्तीमुळे त्याला गाव सोडताना दु:खही होते. त्यामुळे हा मास्तर वाचकाला चटका लावून जातो. आयबू, गावकरी यांचा विरह त्या गावात एकरूप झाल्यामुळेच मास्तराला जाणवतो. पण तो कुठेही व्यक्त करीत नाही.

२) "बनगरवाडी" चे सामाजिक जीवन कसे आहे हे कादंबरीचे दुसरे आशय सूत्र आहे.

"बनगरवाडी" ही उजाड माळावरची वाडी. त्यामुळे अल्पकाळ टिपणा-या गवतावर मेंढपाळाचा धंदा हा इथला प्रमुख धंदा. इथले धनगर मुळातच पोटार्थी त्यामुळे शाळेपेक्षा मेंढरांचे रक्षण त्यांना अधिक मोलाचे वाटते. म्हणून मुलांनी शाळेत जाऊन बसण्यापेक्षा मेंढरामागे गेल्यास फायदा होतो हा त्यांचा समज आहे. इथल्या मेंढपाळाच्या व्यवसायात हे धनगर ऐकमेकांना मदत करतात. उदा. मेंढरांची पैदास करणा-या धनगराला मेंढी मोफत देतात. या धंद्यात ते इतके तरबेज बनलेत की कुठल्या मेंढीची पैदास कोणती १ याचे ठोकताळे त्याना माहित आहेत. एवढेच नव्हे तर मेंढरे राखता राखता जागृत राहण्यामुळे ते बसून झोप घेतात. उदा. काकुबा धनगर आडवे होवून झोपण्याचे विसरून गेला. तसेच लांडग्याचा वास सुध्दा त्यांना सहज ओळखला येऊ लागला. लांडग्याला मारताना लहान मुले सुध्दा जीवाची बाजी लावतात. अशा या मेंढपाळ धंद्यात कधी "डंगळयाचा रोग" मेंढरांना होतो व मेंढपाळांची खांडेच्या खांडे नष्ट होतात व मेंढपाळ हवालदील होतो.

या व्यावसायिक जीवनाखेरीज एकमेकाशी वागताना हे मेंढपाळ प्रेमाने

वागतात. आयबू सारख्या परदेशी माणसाला ते गावगाडयात सामाऊन घेतात. मास्तरांच्यावर विलक्षण विश्वास या लोकांचा असतो. तेवढाच देव-देवता अंधश्रध्दा, परंपरा, रूढी यांच्यावरही असतो. एकमेकाला अडी-अडचणीला हे मेंढपाळ मदत करतात. कारभारी, पंतसरकार यांच्या बद्दल इथल्या मेंढपाळांना आदर होता. तेवढाच आदर मास्तराबाबतही होता. मात्र गावा विरूध्द वागणाऱ्याला वाळीत टाकले जाते.।

।गावचे काम करताना इथली धनगर मंडळी रात्र-दिवस न पहाता काम करतात. उदा. तालमीवर पेंड टाकताना रात्रीचाच टाकतात.'

। अशा या धनगरांचे जीवन निसर्गाच्या तालावर चाललेले असते. सुगी येताच धनगर मंडळी आनंदी बनतात. गजीनृत्य, ढोल, लेझीम यांच्या तालावर रात्रभर नाच चाललेला असतो. उन्हाळयात मावल्या आईची यात्रा मोठया भावीकतेने केली जाते. अंगात नेवी कपडे घालून धनगर सजतात. आनंदी बनतात.

मात्र दुष्काळ पडला की पोटासाठी गावसोडून परमुलखाला जायला लागतात. अशावेळी काही धनगर पांढरीतच मरण यावे म्हणून हटूनही बसतात. पंत सरकारच्या "पाटील" या शब्दाने शहारणारा कारभारी जसा आहे. तसेच नवऱ्याच्या वाईट चालीला क्षमा करून त्याला घरात घेणारी सोशिक नानी सारखी स्त्रीही आहे. जाती पातीची बंधने कडक रीतीने पाळत असल्यामुळे जाती विरूध्द वागणाऱ्याला शासनही भोगावे लागते. अशा प्रकारे अज्ञानी धनगर असूनही त्यांच्या वागण्यातून एक सच्चेपणा जाणवतो. तो सच्चेपणा त्या रानांचाच गुणधर्म होय.

तिसरे सूत्र आहे "बनगरवाडी"तील निसर्ग, "बनगरवाडी"चे मेंढपालाचे जीवन निसर्गाशी बांधलेले आहे. या बनगरवाडीत पावसाळा हा ऋतू फारसा

नसतो. उन्हाळा व हिवाळा असे दोनच ऋतू येथे दिसतात. हिवाळा येताच माळावर हिरवे गवत उगवते, बाजारीचे पिक शेतात येते. तेव्हा मेंढपाळ खुशीत असतात. पेरणीच्या वेळी शेतातील वापशाला महत्त्व असते अशा वेळी शेतकरी स्वस्थ बसत नाही. ही वेळ महत्त्वाची बैल मिळाला नाही म्हणून हातपाय न गाळता नानी "बैल" होऊन थटलेली पेरणी सुरु करते. म्हणजेच वेळ प्रसंगी माणूस सुध्दा जनावराचे काम करतो. सुगी येताच सुगीच्या कामात हा धनगर गर्क होतो. तर लहान मुले मधाची पोळी शोधून मध खात राहतात. रामोशी ठासणीच्या बंदूका, गोफणी घेऊन, कांडया करकोचा, चरबीने भरलेली पाखरे यांच्या शिकारी करीत हिंडतात तर गोरगरीब सरवा वेचत खळ्यावरुन हिंडतात.

त्याचवेळी कोल्हाटी, दरवेशी, गारुडी खेळ करुन लोकांची करमणूक करतात. धनगराची पोरे गजीनृत्य करु लागतात. ढोलाच्या आवाजात धनगर त्यांच्या बायका, पोरं देहभान विसरतात. [illegible] . गावात एकदम तरुण-मुला-मुलींची लग्ने ठरवितात [illegible] उन्हाळयात चहा-पानी, बिडी ओढत गप्पा मारत बसतात. गावात एकदम तरुण मुला-मुलींची लग्ने ठरवितात व एका मुहूर्तावर ती करुन ही टाकतात, त्यामुळे गाव जेवणाचा भार कुणा एकावर पडत नाही. उन्हाळा यात्रा, लग्ने यातच निघून जातो. मात्र कधी दुष्काळ संकट म्हणून येतो आणि मेंढरानां "डरंगळया रोग"होतो. हा हा म्हणता धनगरांची मेंढरे मरतात. धनगरही पोटासाठी, मेंढरे जगविण्यासाठी गावसोडून दूर जाऊ लागतात. फिरुन पुन्हा पाऊस पडल्यावर आपल्या वाडीत येतात असे हे निसर्ग चक्र धनगरी जीवनात येते. त्यामुळे निसर्गाच्या तालावरच इथले मानवी जीवनही झुलत असते.

"बनगरवाडी"ची प्रदेश वैशिष्टये:

व्यंकटेश माडगूळकरांनी "बनगरवाडी" कादंबरीसाठी माणदेशाकडील उजाड, माळरानचा प्रदेश निवडला आहे. हा प्रदेश कमी पावसाचा, ओसाड, त्यामुळे माळावर उगवणा-या अल्पजीवी गवतावर चरणारी मेंढरे व त्या मेंढरांच्या जीवावर जगणारी धनगर मंडळी. या ओसाड माळरानावर कमी पावसामुळे धान्य उत्पादन जवळ जवळ नाहीच. उगवणारी बाजरी, करडी अशी पिके. या पिकावर व मेंढरावर इथली मंडळी आयुष्य कंठीत असतात.

हा प्रदेश यंत्रदूर, रस्ते फारसे चांगले नाहीत. धनधान्य नसल्याने व्यापार-उदीम कमीच. त्यामुळे वहातूक नाही. वहातूक नाही म्हणजे वृत्तपत्र नाही. जगात काय चालेले आहे याची कल्पना नाही. दुसरे असे की, पोटासाठीच सारी धडपड असल्याने शाळा शिकण्यापेक्षा मेंढरे राखणे इथल्यादृष्टीने फायद्याचे. त्यामुळे शाळा नावालाच. शाळा नाही म्हणून अज्ञान व अज्ञानामुळे बाहय-जगाची जाणीव नाही. सकाळी उठणे, मेंढरे घेऊन हिंडवायला जाणे व परत संध्याकाळी घेऊन येणे. या मेंढरांच्या उस्तवारीतच संपूर्ण दिवस. त्यामुळे यंत्रयुगामुळे येणारी सुधारणा नाही व समृध्द जीवनही नाही. अशा या बाहय-जगाची नाळ तुटलेल्या लोकांचे जीवन. हे ही एक जीवन आहे पण या जीवनाची ओळख नाही. या "जगाची" ओळख करून देणे हाच हेतू माडगूळकरांचा असल्याने व खुद्द माडगूळकरांचे जन्मगाव याच ओसाड प्रदेशातील असल्यामुळे त्या जीवनाचे भयावह दर्शन लोकांना करून द्यावे या हेतूने हा प्रदेश, कादंबरीसाठी माडगूळकरांनी निवडलेला आहे.

अशा या प्रदेशात कोकणच्या नारळी पोफळीचे वैभव नाही. इथे कमी पाऊस असल्यामुळे ऋतुचक्र सुध्दा उन्हाळा, हिवाळा या दोन ऋतुभोवतीच फिरते.

माळावर गवत उगवताच इथले मरगळलेले जग सजग होते. इथल्या सणा-उत्सवांना भरती येते. मैंदरे, माणसे नाचू, गाऊ, लागतात व उन्हाळा येताच पुन्हा मरगळ सुरु होते. या परिसरात छोटी छोटी गावे. गावे कसली तर वस्त्याच त्यांना म्हणता येतील. "बनगरवाडी" ही सुध्दा छोटी धनगरांची वस्तीच आहे. या गावात शहाणासुरता, लिहितावाचता येणारा माणूस म्हणजे मास्तर, बाकी सगळा गाव अडाणी, निरक्षर, त्यामुळे मास्तर हा न्यायाधिशाची, पोष्टमनची, अशा कामापासून चोळी शिवून आणून देण्यापर्यंतची सर्व कामे करणारा. इथे धनगरीप्रेमापेक्षा स्त्री-पुरुष प्रेमाचा जिव्हाळा मास्तरला लाभतो. म्हणजेच, मास्तर म्हणजे "वाडी"च्या दृष्टीने "देव"च असतो. इथे श्रध्देला फार मोठे स्थान आहे. जात-पात, लहान-मोठा, मान-पान यांची जपणूक केली जाते. निसर्गाच्या तालावरच इथले जीवन चाललेले असते. सुगी येताच यात्रा-सण, गजीनृत्य, ढोल, लेझीम यांना बहर येतो व सुगी संपताच उजाडभूमी प्रमाणे इथली मनेही उजाड बनतात. म्हणूनच इथला निसर्ग हा पात्र बनूनच कादंबरीत येतो व बनगरवाडीच्या जीवनावर परिणाम करीत राहतो. म्हणूनच प्रा. मा.ना. कागले लिहितात--"माडगूळकरपूर्व मराठी कादंबरीप्रमाणे केवळ निसर्गाला वाहिलेली ही कादंबरी नव्हे तर निसर्गाश्रित मानवसमुहाचे जीवनदर्शन हा तिचा विषय आहे."[२]

इथला निसर्ग लोकांना देवही असतो आणि मित्रही असतो, पण तोच कधी कधी रुसतो, उग्ररुप धारण करतो. आणि मित्रच शत्रूही बनतो. तरीही इथला माणूस दु:खाने कोलमडून न जाता खचून न जाता सोशिकपणे, चिवटपणे जगत राहतो येणाऱ्या संकटाला सामोरा जातो. गावगाडयाच्या विरुध्द जाणाऱ्या माणसाला वाळीत पडावे लागते. गावच्या रुढी, परंपरा मोडणाऱ्याला शासन होते. जात-पातीची बंधने पाळावी लागतात. उच्च-निच भेदभाव

ही पाळला जातो. मास्तरासारख्या माणसांना मदतीचा हात देताना इथला माणूस मागेपुढे पहात नाही. एवढेच नव्हे तर आपल्या जीवनातील नाजूकप्रश्न व त्यावर उपाय काय करावा याचा सल्ला मनमोकळयापणाने स्त्री असो वा पुरुष घेत जातात. इथले समाजजीवन जणू सामुदायिक जीवनच असते इथल्या निसर्गाचा व धनगरी जीवनाचा अन्योन्य संबंध आहे.

अशा या "बनगरवाडी"चे दर्शन घडविण्यासाठी माडगूळकरांनी तिथे राजाराम विठ्ठल सौंदणीकर या शिक्षकाची पाठवणी केली व मास्तराच्या डोळस दृष्टीतून "बनगरवाडी"चे दर्शन आपणास करुन दिले हे बनगरवाडीचे प्रथम दर्शन आता पाहू.

बनगरवाडीचे प्रथम दर्शन:

राजाराम विठ्ठल सौंदणीकर शिक्षकाची आर्डर घेऊन नोकरीवर रुजू व्हायला भल्या पहाटे 'बनगरवाडी'च्या वाटेला लागतो तेव्हा त्याला जाणवते की, सभोवताली काळे-तांबडे नांगरुन पडलेले जमिनीचे तुकडे, न नांगरलेल्या पडीक जमिनी उन्हाच्या तडाख्याने उलल्या आहेत. त्यांना एवढया मोठया भेगा पडल्या आहेत की, त्यात पिंढरी एवढा पाय जाईल. आजूबाजूला सपाट मोकळा माळ, बाजरीची तांबडीराने, आणि मध्येच गबाळे पडावे तशी पडलेली तीस-पस्तीस घरे, अशी ही 'बनगरवाडी' हम रस्त्यापासून खूप आतवर माळावर सुस्तावून पडलेली आहे. ती अत्यंत उदास व भकास दिसते. अनादिकालापासून पांढरे व तुरळ काळया ढगांनी व्यापलेले आकाश घेऊ, घोंघावणाऱ्या वाऱ्यावादळाशी साथ करीत. मातीच्या भिंती वखपलीच्या काडाने शाकारलेली छपरे, तर काही धाब्याची, ही ३०–३५ घरे कशी बशी उभी आहेत. हरेक घरापुढे लहानमोठे अंगण, सांडपाण्यावर वाढलेले लिंबारे, शेवगे, आणि घराच्या मागच्या बाजूला काटेरी कुंपण घालून केलेले मेंढरे कोंडण्याचे कोंडवाडे, कुठे भिंतींला लागून एखादे

गाडीचे मोडके पडलेले चाक, रस्ते नाहीतच. घरे बांधून उरलेल्या जागा चालण्यासाठी वापरल्या जातात. घरांच्या कवाडांना कुलपे नाहीत. गावा-बाहेर दगड चुन्यांनी बांधलेला पाण्याचा एकुलता एक हेल, सदा पाण्याची ओरड. अशा या बनगरवाडीतील शाळाही नमुनेदार - जिच्या तुळयावरुन पूर्वीच्या मास्तरांनी म्हणी लिहून ठेवलेल्या, पूर्व-पश्चिम दिशांना दिशा दर्शक रंगीत पाटया, आढयाला शेराची फांदी, चिलटाचे पुंजके, चिमण्यांची घरटे, त्यांनी शिटून केलेली पांढरी घाण, लोंबणा-या वाखाचे दोर, चिंध्या, एक टेबल, एक खूर्ची, फळा हे साहित्य, जवळच एक पेटी, त्या पेटीत फळा पुसायचे फडके, जुने रजिस्टर, हजेरीबुक, खडूची रिकामी बॉक्से, दौत, टाक, सतार नि फटर.

अशा या बनगरवाडीत सकाळ संध्याकाळ मेंढरांचा उडणारा गलका, उंच आरोळया, कुत्र्यांचे भुंकणे, कोंबडयांचे आरवणे, व रस्त्याने मेंढरांच्या पायांनी उडणारी धूळ त्यांच्या मागे चमत्कारिक आवाज करीत येणारे-जाणारे काळेभोर धनगर, केसाळ कुत्री, दिवसा मात्र ही बनगरवाडी सुस्त असते. सकाळी माळावर मेंढरे चारायला गेलेले मेंढके संध्याकाळीच आपली मेंढरे घेऊन परतात. मग ती जुगवणे, धारा काढणे इ. त्यांचा कार्यक्रम यात सहसा फरक पडत नाही.

<u>धनगरी जीवनक्रम:</u> १) ऋतुचक्र-पावसाळा:

बनगरवाडीचा सारा प्रदेश कमी पावसाचा. कधी तरी पावसाळयात आभाळ झाकोळून येते, वारा सुटतो, झाडेझुडे गदगदू लागतात, धूळपामाती चौफेर उडते. सडासडा पाऊस धारा येतात. तापलेल्या जमिनीतून वाफा निघतात. चिखल होतो. व वाहूनही जातो आणि खडे उघडे पडतात. तेव्हाच ही काडाची शाकारलेली घरे गळू लागतात. जमीन पाणी ठिबकून ओली होते. उखरु लागते. व घरफडणा-या धनगरणी गळणा-या ठिकाणी भांडी लावून बसतात. तर

रिकामी पोती घेऊन काही धनगर माळवदावर चढतात व साचलेले पाणी माळवदाला भोक पाडून आत शिरते तेथे दगडमाती घालून तात्पुरते बुजवितात. अशावेळी धनगरांच्या जीवन क्रमात थोडा बदल होतो. त्यांच्या कु-हाडीना गंज चढतो. पोपटी रंगाचे गवत जमिनीतून डोके वर काढते, अंगणात, माळवदावर, छपरावर जिथे उगवू नये तेथे गवत उगवू लागते. सर्वत्र पोपटी रंग दिसू लागतो. अंगल्याच्या नखावर बसू शकतील एवढ्या बारक्या बेडक्या दिसू लागतात. त्या टणाटण उडताना कावळे त्यांच्यावर झडपा घालातात. लोटीशी पंखे असलेले किडे हजारो लाखोंनी उडतात व साळुंख्या, चिमण्या त्यांचा फडशा पाडतात, व मेलेल्या किड्यांचे पंख सर्वत्र विखुरतात. वाणी किडे एकमेकांना पाठीवर घेऊन चालतात. त्यांचे "पैसा करून" धनगरांची पोरे हातावर नाचवितात. माशांची चिलटांची गुणगुण व घोंगावणे, कधी मेंढराच्या नाकावर बसते. मेंढरांच्या, गुरांच्या पायांना चिखलाचे लपके चिकटू लागलेले, व त्यांच्या पाठीवर बसून काळे कोतवालपक्षी घोगरा आवाज काढताना दिसतात. हे फक्त पावसाळ्यातच तेही क्वचित घडते. निसर्गाच्या चमत्काराने 'धनगरवाडीचे रूप पालटते. कधी जिराडतातील बाजरी हळूहळू वाढते, पोटरीतून लांब दांड्याची शेलाटी कणसे बाहेर पडतात. हिरव्या ताटांवर तपकिरी रंगाची कणसे डुलू लागतात. पिकावर जांभळा फुलोरा धरला की मधमाशा कणसा भोवती फेर धरतात. फुलपाखरे जोडीजोडीने येऊन बसतात, कडधान्याचे वेल पसरू लागतात. मटकीच्या शेंगाचे झुपके दिसतात. हुलगा जोमात येतो. तुरीच्या उभार झाडावर बाकल्या शेंगा दाण्यांनी भरू लागतात. भुईमुगाच्या मुळ्या अंडी धरू लागतात. बांधा बांधावर कुर्डूचे पांढरे-जांभळे तुरे दिसतात व थोड्याच दिवसात ज्वारीच्या कणसे टच्च दाण्यांनी भरतात. पिकांचे थवे भरारत येऊन दुधाने भरलेले दाणे खातात व पोरेढोरे तयारी धरू लागतात. हिरवा पाला खाऊन मेंढरे गुबगुबीत

होतात. त्यांच्या अंगावर चरबी चढते नडीअडचणीला त्यांना बाजारात चांगली किंमत येते.

## २) सुगी:

नंतर सुगीचा हंगाम सुरु होतो. पाच महिने वाढलेली बाजरीची जोमदार धाटे विळ्याच्या तडाख्यांनी आडवी होतात. लगोलग त्यांच्या पेंढ्या बांधून बुचाडी उभी लावली जातात. त्यामुळे कणसे दडपली जावून बाहेर न आलेले दाणे कणसाबाहेर पडतात. मग या बुचाड्या उलगडून त्याच्या लहान लहान कोथळ्या घालून सूर्याचे ऊन दिले जाते. ओले दाणे वाळू लागतात. त्याच्यावर बैले, चिमण्या गर्दी करुन खातात, ज्याना फारच बाजरीची नड असेल ते मोडणी व बडवणी करुन दाणे घरी नेतात. बाजरीची सरमाडे जनावरे कुरुकुरु करीत खातात. तर माणसे बाजरीच्या हिरव्यागार भाकरी खातात. ज्यांच्या घरी धान्य शिल्लक असे तो घाई न करता सुगीला चालढकल करतो. कडधान्येही हळूहळू निघतात. हुलग्याचे पीक शेंगा कुरकुरायला लागल्यावर निघते. भुईमुग निघतो. मटकी निघते. राने उलघडतात व शेळ्या मेंढ्या चगळ चोथा वेचून खाऊ लागतात.

## ३) हिवाळा:

अशातच थंडी सुरु होते. धनगर शेकोट्या पेटवून काळ्या घोंगडीत अंगे लपेटून शेकतात. कडक थंडीने निवळशंख ओढ्याच्या पाण्यावर, विहिरीच्या पाण्यावर सकाळच्या प्रहरी वाफा दिसू लागतात. यानंतर पुन्हा एक सुगी सुरु होते. ज्वारीची धाटे कमरेएवढी येतात. करडयाला सुरेख पिवळी फुले येतात. हरभ-याला पोचट घाटे लोंबू लागतात. हिरवे बाटूक खाऊन जनावरे गोलगरगरीत होतात. पांढरीफेक दिसतात. शिंगाने माती उकरतात. बांडा घाटाचा 'ऊस'

आणि ओला हरभरा खाण्यासाठी पोरे चो-या करतात. तशीच जनावरेही राखणदाराची नजरचुकवून ज्वारीची धाटे ओरबडू लागतात. चिकट हातांनी आणि पकाटे उठलेल्या तोंडांनी पोरे रानात हुंदडतात. हुरड्याचा खुराक आगट्याच्या-जवळ सुरु होतो. म्हातारे कोतारे सुध्दा खलबत्यांत कुटून हुरड्याची चव घेतात. बायकाही सवड काढून चार दाणे तोंडात टाकतात.

या सुगीची माहिती दरवर्षी येणा-या परदेशी पाखरांनाही असते. सुर्याच्या उगवण्याबरोबरच ते "ट्रॉव ट्रॉव" आवाज करीत थव्यांनी येतात. पोरे त्यांना हाकारतात. पण ती पिकाची नासाडी करतात. तेव्हा शेतकरी आभाळात पटके फेकून, आरडाओरडा करुन त्यांना बुजवितात. तीन कोंबड्याच्या वजनाची ही पाखरे पाहून रामोशांना शिकारीचा मोह होतो. तोंडाला पाणी सुटते व ठासणीच्या बंदूका, गोफणी घेऊन त्यांची शिकार करतात व त्यांच्या झोपड्यातून शिजल्या मासाचा वास घमघमतो. तशीच रामोश्यांची पोरे व धनगरांची पोरे रानोमाळ भटकून मधाची पोवळी धुंडाळतात व मध खाऊ लागतात.

नंतर ज्वारीची, हरभ-याची काढणी- मळणीची सुगी सुरु होते मोत्या-सारखे धान्य पाखरा-गुरांच्या तडाख्यातून वाचलेले शेतक-याच्या पदरात पडते. त्यातले बरेचसे बलुतेदारांना जाते व उरलेले शेतक-यांच्या घरात जाऊन पडते. मोकळ्या रानातून, खळ्यावरुन सरवा वेचण्याचे काम गोरगरीबांचे सुरु होते. त्यांच्या नजरेतून सुटलेले धान्य पाखरे टिपतात, किडा मुंग्याच्या मुखात जाते.व त्यातूनही राहिलेले जमिनीतून पडून पावसाची वाट बघते. पुन्हा राने मोकळी पडतात. पाखरे पांगतात. धनगर मुक्त होऊन गप्पा गोष्टीत, खेळात मन रमवू लागतो. अशातच दरवेशी अस्वल घेऊन खेळवू लागतात. गारुडी हात चलाखी दाखवू लागतात. कोल्हाटी उड्या मारुन दाखवितात व धनगर खुष होवून शेर-

पायली धान्य त्यांच्या पदरात घालतात. रात्री धनगर मोर-बैलांची चित्रे काढलेल्या छाटण्या घालून गजीनृत्य ढोलाच्या तालावर करतात. धुंद होवून जातात.

४) दुष्काळ:

असा हा निसर्गक्रम बनगरवाडीच्या जीवनात चालू होतो. पण हाच निसर्ग जेव्हा कोपतो तेव्हा 'मावल्या आईने अभय देऊनही नक्षत्रामागून नक्षत्रे कोरडी गेली. 'बनगरवाडीवर पाण्याचा टिपूस पडला नाही. तापलेल्या जमिनी निवल्या नाहीत. झाडेझुडपे वाळूनकोळ झाली, भुकेल्या मेंढरींनी चगळ न् चगळ वेचले. फुफाटा फार झाला. चक्रीवादळे होऊ लागली. विहिरीचे पाणी आटले. वाडीचा हेळ आटला. चिखलाने गढूळलेले पाणी नरोट्याने खरवडून-सुध्दा घागर भरेनाशी झाली. सकाळ-दुपार लोक पाण्यासाठी हेळावर गर्दी करु लागले. संध्याकाळच्या सुमारास चिमणीला प्यायलाही पाणी उरेनासे झाले. माणसे भल्या पहाटे उठून पाण्यासाठी जाऊ लागली. भांडू लागली. जनावरांना पाणी-चारा मिळेना. वखवखलेले उंदीर गावात शिरुन धुमाकूळ घालू लागले. घोंगड्या कातरु लागले, सुपे कारु लागले, दुरड्या कातरल्या, लोक उपासतापास काढू लागले. धान्य महाग झाले. पैशासाठी मेंढरे विकू लागले. धान्य घेऊ लागले. अन्नाच्या शोधासाठी दूर जावू लागले. गाव सोडू लागले. रामोशी धोतराने पोटे आवळून भूक मारु लागले. तोंडावरची रया जाऊन लोक भूक मारण्यासाठी दारु पिउ लागले. जनावरे पाय ओढत चालू लागली. मेंढरांना जुलाब होऊन मरु लागली. मेलेल्या मेंढरांना खाण्यासाठी घारीगिधाडे वाडीवर फिरु लागली. धनगरांची काठी बसली. दुष्काळाने 'बनगरवाडी' उध्वस्त झाली. मने घट्ट करुन तरुण मेंढक्यांनी पोटभरण्यासाठी गाव सोडले. बेंबेऽऽ

8629

करून ओरडणाऱ्या मेंढरांना हाक लीत, त्यांच्या थकलेल्या पोरांना उराशी उचलून घेत त्यांची जगण्यासाठी यात्रा सुरु झाली. असे हे निसर्गचक्र बनगरवाडीत चालू राहते. 'बनगरवाडीचे रखरखीत, अनुत्साही, उदास, भकास वातावरण बनगरवाडीच्या धनगरांना आकार देते. हे धनगर येथे धुळीत पिढयान् पिढया जगले. 'बनगरवाडीचा हा भकासपणा धनगरांच्या श्वासोच्छवासात प्रगटला आहे. धनगरांनी तो आत्मसात केला आहे. म्हणूनच प्रा. अ.रा. तोरो लिहितात, "... दारिद्र्यामुळे भोगावे लागणारे दु:ख व यातना ते शांतपणे केवळ अपरिहार्य म्हणून भोगतात. ही अपरिहार्यता त्यांना धनगरवाडीशी जखडून टाकते. निळभोर आकाश, प्रसन्नपणे खळाळणाऱ्या लाटा, उत्तुंग पर्वत, गर्द झाडी, सागर किनाऱ्याचे चांदणे, उंच माड, नारळी पोफळी असा मन प्रफुल्ल करणारा निसर्ग बनगरवाडीत नाही. 'बनगरवाडीची माणसे काय, जनावरे काय किंवा उन्हाने तापणारी धूळ काय, या साऱ्यातून एक रखरखीत भकासपणाची उग्ररेषा साऱ्या बनगरवाडीला व्यापून राहते. बालकंटातील खडबडाटपणा व भकासपणा हे जणू धनगरांचे जन्मसिध्द गुणविशेष ठरतात."[3]

<u>बनगरवाडीची सांस्कृतिक वैशिष्टये: यंत्रदूरजीवन, अंधश्रध्दा, सण, उत्सव.</u>

या बनगरवाडीची सांस्कृतिक वैशिष्टयेही वेगळीच आहेत. मुळात या धनगरांना शिक्षणाचा, यंत्रयुगाचा गंध नाही. मेंढरे चारणे, त्यांची पिले जोपासने, त्यांच्या जीवावर स्वत:चे पोट भरणे व मरणे या क्रमाबाहेरचे त्याचे जीवन नाही या त्यांच्या जीवन क्रमात थोडा बदल होतो तो गावच्या माळी आईच्या यात्रेत. ही यात्रा दरसाल भरते. गावाच्या बाहेर एक मैलावर लोटयाश्या टेकडीवर खोपीत या माळी आईचे स्थान आहे खुद्द पुजाऱ्याच्या स्वप्नात येऊन तिने सांगितले की, "देऊळ बांधू नका. मी आहे तीच आनंदात

आहे."[४] ही माळली आई जशी नवसाला पावणारी देवी आहे. तशीच ती स्वप्नात येऊन दृष्टांतही देते. ती कारभा-याच्या स्वप्नात आली व त्याचा मृत्यू सांगून गेली. तसेच मुलं न होणा-या शेकूच्या बायकोला देवी-बद्दल एवढा विश्वास की, ती म्हणते, "देवाच्या मनात असलं तर वठक्या झाडाला सुदीक फळ धरलं."[५] या देवीवरच सर्व धनगर भार टाकून जगतात. या देवीच्या यात्रेला चांगले-चुंगले कपडे घालून धनगर जमतात. "मावल्या आईचं चांगभलं" म्हणून गुलाल, रताळी, गाजरी, मुठीने उधळतात, व तो प्रसाद शोधण्यासाठी रेटारेटी, आरडाओरड होते. धुळा बनगराच्या अंगात येऊन, तो पाऊसपाणी, पाप पुन्याईचा पाढा वाचू लागतो. भविष्य वर्तवितो. तर बाळा बनगरासारखे लोक देवीपुढे पदर पसरून आपल्या चुकीची माफी मागतात. गावाला शरण येतात. डफडे-पिपाण्याच्या गजरात मग चुका करणा-याला माफी दिली जाते. त्याला समाजात घेतले जाते. बाळा धनगरानेही तालीमीला लाकूड दिले नाही म्हणून गावाने त्याला वाळीत टाकला पण शेवटी तो शरण आला. धनगरांच्या जीवनात सामुदायिक जीवनाला फार महत्त्व आहे. इथले लोक सामुदायिकपणे मेंढरे चारतात. सामुदायिकपणे विचार-आचार करतात. उदा. तालीम बांधणे, शाळेला मुले पाठविणे, बाळाधनगराला वाळीत टाकणे, जगन्याने वांगीची बाई काढून आणल्यावर त्याला व तिला शासन करणे, सामुदायिक निर्णय घेणे, शासन करणे ही बनगरवाडीची जीवनपध्दती आहे. इथे प्रत्येकाची मुलगी ही गावची मुलगी असते. तिच्या इज्जतीसाठी सारा गाव डोळयात तेल घालून वावरतो. इथे शिंदळकी, प्रेम, यागोष्टींना थारा नाही हे धनगरी जीवन बालबोध आहे. तालमीची इमारत जेव्हा मास्तराच्या व बनगरवाडीच्या अब्रुचाप्रश्न बनते तेव्हा सारी वाडी एकत्र येऊन तालमीवर पेंड

टाकण्याचे काम गॅसबत्ती पेटवून पुरे करतात. तेव्हा आयबु वरून खाली पडल्यावर लोकांचे लक्ष विचलीत होवून न देता कारभारी सांगतो की, हे लग्न कार्यच आहे, मेले मढे झाकून ते उरकणे आवश्यक आहे व सर्व गाव त्या पध्दतीने तालमीचे काम पूर्ण करतो. पंत सरकारला ओवाळायला सुवासिनी आरत्या घेऊन सज्ज होतात. सर्व धनगर नवी कपडे घालून पंत सरकारला बघायला उत्सुक होतात. राजा गावात येताच गावच्या पाटलाने हातात समाया व एक नारळ घेऊन त्यांना सामोरे जायचे असा रिवाज होता. बनगरवाडीला पाटील कुलकर्णी नव्हता तर गुरुजीनी कारभाऱ्यालाच पाटील करुन तो मान दिला. गावचे सामुदायिक गजीचा ढोल, लेझीमचा सरंजाम, लाठ्या, बोथाट्या, पट्टे हे सर्व साहित्य तालमीत येऊन बलोपासना सुरु झाली व शाळेत ज्ञानोपासना सुरु झाली.

सामुदायिक खेळ:

उत्सव, सणां बरोबरच गजीढोल, लेझीम, बोथाटी, दांडपट्टा यांचे खेळ सामुदायिक चालत. किरकोळ वैर खेळात, यात्रेत विसरले जाई.

श्रध्दामूल्ये:

अशा या बनगरवाडींची काही श्रध्दामूल्ये होती. पिढीजात दारिद्रया-बरोबर जतन करुन ठेवलेली अंधभक्ती व त्यामुळे जीवनात आलेली उदासिनता व मानसिक दौर्बल्य हे बनगरवाडींच्या सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे भाग आहेत. धर्मावर आधारलेल्या पापपुण्याच्या पारंपारिक कल्पना वाडीत स्थिरावल्या आहे. देवाच्या मनातच असलं तर वठक्या झाडाला सुदीक फळ धरंल ही शेकूच्या बायकोची श्रध्दा आहे. मावल्या आई स्वप्नात येऊन दृष्टांत देते, ही माव्ली आइ धनगराचे दैवत. मावल्या आईच्या कृपेने पाऊस पडतो, हिरवळ वाढते, मेंढ्या

पोसतात, आणि बनगरवाडी जगते म्हणून "मावल्या आई" ही वाडीची खरी आई. आश्रयदाती, स्फूर्तीस्थान, ती स्वप्नात येऊन कारभाऱ्याला मृत्यूची पूर्वसूचना देते. केस सोडलेले आणि मळवट भरलेली मावली आई भल्या पहाटे स्वप्नात येऊन निघण्याबाबत सूचना देते. "बनगरवाडीत एक वर्ष पाऊस पडला नाही तेव्हा धुळा धनगराच्या ती अंगात येते व म्हणते, "पाप फार झालं, लबाडपणा बोकाळलाय रे! त्येनं पाऊस गेला!" [६] या लोकाचा भूताखेतावर विश्वास आहे. दादू बालटया बरा व्हावा म्हणून त्याची आई व बायको देवधर्म, गंडे, ताईत, करीत होती. देवरुषीला विचारत होती. पण बालटयाचा मात्र विश्वास होता की, मी खूप खाईन, दूध तूप, साखरचपाती, बकरे कोंबडया खाईन फिरुन जवान होवून उठेन. चिलटाने बिघडलेले डोळे दुधाने भिजलेले कापसाचे बोळे झोपताना मुलांच्या डोळयावर बांधल्यावर डोळे बरे होतात ही श्रध्दा. दिवे लागणीच्या वेळी झोपणे म्हणजे करंटयापणाचे लक्षण मानले जाई. तसेच खांडातले मेंढरु लांडग्याने धरले तर मेंढरांना साथीचा रोग होत नाही अशी श्रध्दा होती. देवीच्या काचोळीची शपथ घेणे, देवीपुढे पदर पसरणे, अंगात येणे, कुणाच्या पाचोळयावरपाय देऊ नये, खंडोबाची, गळयाची आण घेणे, सुटली म्हणाणे, बाळा धनगराने गावाला झाड दिले नाही म्हणून त्याचे व गावाचे व्यवहार तोडून त्याला वाळीत टाकले. भूत माणसाला घोळसते. बालटयाला भुतानेच घोळसले असा समज. माणदेशचा परिसर दुष्काळी का ? तर त्याची एक कथा हे धनगर सांगतात. "रामलक्षिमन देव देव करत आपलं हिंडू लागलं. हिंडता हिंडता आपल्या भागामधी आलं. रामघाटाच्या वर दुपार झाली म्हणून भाऊ भाऊ सावली बघून जेवाय बसलं आन् पाऊस आला. जोरकस आला. अन्नात पानी पडू लागलं राम रागावला अन् एक बाण मारुन

त्येनं पाक्साला पार बालेघाटात पिटाळला. तवाधरनं जो ह्या मानदेशात पाऊस [नाही त्ये आजपातूर न्हाई, बघा तुम्ही राम घाटाला पाऊस] पडतो आन् आपल्या टकु-यावरनं काळं ढग नुसतं जात्यात, जात्यात आन् पुन्ना पडत्यात ते बालेघाटला."[७] अशी श्रध्दा सा-या धनगरांची आहे. ही धनगरे विश्वासू, आहेत. कारण रामा 'बुचडयाचा रूपाया' मास्तराला मोडायला देतो तेव्हा मास्तरला, दोन आणे जादा आलेले परत द्यायला येतो. मास्तरसुध्दा तेवढयाच प्रामाणिकपणे लोकांची कामे करत आहे. धनगरांचा मास्तवर व मास्तरांचा धनगरावर विश्वास असल्यामुळेच रामा धनगराने चांदीच्या नगद रूपयांचे गाठोडे मास्तराच्या हवाली केले व ते बदलून आणायला सांगितले. पण आनंदाने भाकरीच्या आशेने बदलून आणलेल्या पैशाचे गाठोडे चोरले, परतही आणून दिले.

न्यायदान:
--------

'बनगरवाडींत तंटे-बखडे झाले तरीही ते कचेरीपुढे जात नसून चावडीपुढे दहाबारा वृध्द मंडळी जमून न्याय देत. तो वाडीला मान्य करावा लागे. नाहीतर धनगरांचे महादैवत बोलावून न्याय द्यावा लागे. पण त्यासाठी जेवणाचा खर्च येई म्हणून कोणी त्याना बोलावण्याच्या फंदात पडत नसत. हा न्याय मास्तर, कारभारी, काकुबा, [illegible] असली वृध्द मंडळी देत.

लग्नपध्दती:
---------

या वाडीत लग्नेसुध्दा एकदम करण्याची पध्दत होती. दरवर्षी एक मुहूर्त बघायचाआणि त्याच दिवशी गावातली सगळी लग्ने उरकून घ्यायची, त्यामुळे गाव जेवणाचा भार एकावर पडत नसे. अशी दहावीस लग्ने लागल्यावर प्रत्येकाच्या वाटयाला दहा वीस पाने येत. एखाद्या गरजूचे पैशा मुळे लग्न अडत

असेल तर सारा गाव एकत्र जमा होई आणि "अमकातमका" अडला आहे, त्याला धक्का देऊ या"[८] असा विचार पक्का होई. सर्वजण त्याचा भार उचलत आणि गरजूचे लग्न होवून जाई.

शिक्षकाची कामे:

मास्तरकडे जज्ज, पोलिस अधिकारी, पाटील-कुलकर्णी आणि स्टँप व्हेंडर-सुध्दा इ. पदे असत, एवढेच नव्हे तर "मास्तर, एक बैल बघून दे की मला, पेरनी धरली या"[९] असे म्हणत कोणीही येई. म्हणजे मास्तर वाडीचा सबकुछ असे. तर शाळा कोर्ट, चावडी, पोलिसठाणे, म्युनिसिपालिटी-सर्व काही असे. तेव्हा शाळा-मास्तर-वाडी असा समन्वय असे.

जातीपातीची बंधने:

आपली सामाजिक पातळी, जात, स्थान, इभ्रत सोडून वर्तन करु नये ते पाप आहे अशी श्रध्दा बनगरवाडीच्या धनगरांत असल्यामुळेच अंजी-मास्तर यांचे नसलेले संबंधसुध्दा त्यांना मान्य नाहीत. जगन्या व वरच्या धरातील वांगीच्या-बाईचे संबंध वाडीला मंजूर नाहीत. त्या दोघांना वाडीचे धनगर शासन करतात.

धनगरी संकेत:

शिक्षणाबद्दल ही धनगर मंडळी उदास आहेत. पोटापुढे त्यांना शिक्षणाचा प्रश्न मोलाचा वाटत नाही. म्हणूनच सुरवातीला भेटलेला दादू बलाटया मास्तरला म्हणतो, "हं, हतं काय करायचा गा मास्तर ? साळा चालतीया कुठं हतं ? पोरं हायती कुठं वाडीत ? सरकारला काय ठावं न्हाई व्हय ? रिक्कामा फाजीलपणा..."[१०] ही धनगराची मुलं शेरडामागं आई-

बापांना मदत करायला निघून जात. एवढेच नव्हे तर आपली पोरं मोठी झाल्यावर मेंढरामागं जाणार. सातवीपास होऊन कोणी अंमलदार, वा मास्तर होणार नाही. तीच गोष्ट तालमीच्या बाबतीतही गावात पैलवान नाहीत. म्हणून तालमीलाही विरोध करणारी हीच धनगर मंडळी आहेत. हीच धनगर-मंडळी मात्र जगण्याचा बाप तात्याबा रामोशी हरणावाणी ओरडून मेला असे सांगत, कारण त्याने मरेपर्यंत बंदूकीने खूप हरणे मारली अशी श्रध्दा धनगरांची झाली होती. काकुबा मेंढरे ओलखण्याचे तोडगे सांगतो. आपल्या आईबापाचा कोणता तरी गुण घेऊन जसा माणूस जन्माला येतो तसेच मेंढरांचेही आहे. मात्र बियानं करण्या-याने मेंढरे विकायची वा कापायची नाहीत हा नियम धनगर पाळतात. ज्याला बियाने करायची आहेत. तो खोब-याची एक वाटी थोडा भंडार घालून चांगल्या मेंढक्याकडे जातो आणि ती खोब-याची वाटी देऊन त्याला म्हणतो, "मी बेणं करतोय" मग तो मेंढका आपल्या खांडातील शोलके मेंढरु काढून मागणा-याला मोफत देतो. दरवर्षी सुगीला येऊन कोल्हाटी, दरवेशी, गारुडी खेळ करुन करमणूक करतात त्यांना शेर-पायली धान्य देतात.

## धनगरांचे प्रेम:

शेकूची बायको मास्तरांना शेंगा आणून देते. कारभारी दूध आणून देतो ही मंडळी प्रेमळ आहेत. शेकू संध्याकाळी आपल्या बायकोला "तुडवितो" पण जेव्हा ते अंजीबरोबर लगट करतो तेव्हा ते गा-हाणे ती मास्तरांच्या कानावर घालते. धोतराने पोटे आवळून रामोशी जगतात. तर धनगर इषाने जगतात. काकुबा दुष्काळात वाडी सोडून जात नाही. सारे धनगर जातात पण तो म्हणतो "तुमी जा. माजी माती, इतंच पडंल!"[११] हे त्याचे पांढरीवरील प्रेम. तर लंगडा बाळ्या बाळो धनगराच्या पाठीवर बसून गाव सोडून जातो पण जाता जाता तो मास्तरला म्हणतो, "मास्तर, मी चाललो,

पर जगून माघारी ईन आन् तुजं बघीनं. अरं, मला पक्कं माहीत हाय. तू माझां हातपाय मोडलंस"[१२] ही ईर्षा मोठी चिंतनीय आहे. तसेच मास्तरांचे गोठोडे घेऊन गावाबाहेर जाईपर्यंत मास्तरांना सुरुवातीपासून अखेरपर्यंत साथ करणारा आयबू पाहिला की मन उदास बनते. ही धनगरे जेवढे वेडी तेवढीच मायाळू, तेवढीच हुषार, अंधश्रध्दाळू, जिद्दी, इर्षा करणारी आणि प्रामाणिक दिसतात. मैंदरासारखेच खालीमान घालून आयुष्याची वाटचाल ते करताना दिसतात.

त्यांच्या जीवनात कुठेही फार मोठी उलथापालथ होत नाही. निसर्गाच्या चक्राप्रमाणे त्यांच्या आयुष्याचे चक्र फिरत आहे. या धनगरी संस्कृतीला अजून शहरीकरणाचा वारा लागला नसल्याने ती अनघडच राहिली आहे.

## सामाजिक जीवन:

'बनगरवाडी'चे सामाजिक जीवन पहाताना असे दिसते की, या वाडीच्या धनगराला त्या समाजाचेच जीवन असते. स्वत:ची अशी वेगळी सामाजिकदृष्टी या धनगराला नाही. हे एक सामूहिक जीवन आहे. हे धनगर गावातील लोकांची जशी विचारपूस करतात तशीच परगावचा, अनोळखी माणूस आला तरी त्याची संपूर्ण चौकशी करतात. उदा. मास्तर जेव्हा बनगरवाडीत प्रवेश करतो तेव्हा दादू बालटया त्याची पूर्ण चौकशी करतो. त्याच्या मास्तर-पणावर व पोरवयावर त्याचा विश्वास बसत नाही. शिवाय त्याच्या मते शाळेत पोरं नसल्याने मास्तरचा इथं काहीही उपयोग नाही. तरीही सरकार मास्तरांची नेमणूक हया बनगरवाडीत करते हा सरकारचा रिक्कामा फाजील-पणा आहे. पण कारभारी मात्र मास्तरांची वास्तपूस्त करतो. मास्तरांना दूध आणून द्यायला, रॉकेल तेलाची चिमणी आणून देण्यास सांगतो. जणू तो

मास्तरच्या पाठीमागे शरीरक्षाकासारखा व हितचिंतकासारखा राहतो. (बालटयाने अंजी-मास्तराबद्दल कान फुंकल्यावर काही दिवस याच मास्तराबद्दल अढीने वागतो) मास्तर जेवला का? याची पण चौकशी कारभारी करतो. आनंदा रामोशी चिमणी आणून देतो, तर कारभारी दुधाचे भांडे मास्तरापुढे ठेवतात. यातून परगावच्या माणसाबद्दलचा स्नेह दिसून येतो. मास्तर म्हणजे 'बनगरवाडी'चे दैवत असते. कारण गावच्या तक्रारी, कागाळया, भांडणे, पत्र लिहिण्यापासून, चोळ्या शिवून आणण्यापासून ते थेट पेरणीला बैल बघून देण्यापर्यंतची कामे मास्तरला करावी लागतात. मास्तरवर सर्वांचा विश्वास आहे. म्हणूनच ती विश्वासाने कामे मास्तरवर सोपवितात. उदा. पैसे बदलून आणणे, चोळी शिवून आणणे, तालमीचे काम, पत्र लेखनाचे काम. अशी कामे मास्तरला करावी लागतात. तर दादू बालटयासारखा पहिल्यापासून मास्तरला हुसकावून लावण्याच्या प्रयत्नात असतो. तो म्हणतो पहिल्या मास्तराने गावात चबाटब केली व आपल्या मरनानं मेलं. तेव्हा "तू नवा आला हायेस, नीट आपलं काम कर. गावात चबाटब करु नकंस, पोरं सालेत आली तर त्येस्नी शिकव. गावाला शिकवायच्या भानगडीत पडू नकंस"[१३] या त्याच्या दमबाजीने मास्तराचा जीव दबून गेला, नंतर मात्र मास्तर गावाशी समरस झाला तेव्हा गावाच्या विश्वासापुढे दादू बालटयाचा दम हळूहळू विरत चालला. पण त्याचा पीळ मात्र 'बनगरवाडी' सोडतानाही कमी झालेला नव्हता. बाकी धनगराच्या पाठीवर बसून (कारण त्याचे पाय हात आयबु, आनंदाने सडकून काढले होते. व ते त्यांनी प्रामाणिकपणे मास्तरपुढे कबुल केले होते.). मास्तरला म्हणतो, "मास्तर मी चाललो, पर जगून माघारी ईन आन् तुजं बघीनं. अरं, मला पक्कं माहीत हाय. तू माझं हातपाय मोडलंस!"[१४]

परंतु पुढे मास्तरच्या व गावच्या प्रेमापुढे बालटयाचा विरोध दुबळा झाला.

कारण मास्तर कोणतेही काम मन लावून व विश्वासने करतो हा गावचा समज झाला होता. म्हणूनच तालमीचे काम तो गावच्या सहकार्याने पार पाडतो. सरकारला उद्घाटनला आणतो. कारभा-याला "पाटलाचा" मान देतो. गावात शाळा नावारूपाला आणतो. एवढंच नव्हे तर मोठया विश्वासाने शेकूची बायको, शेकू-अंजी प्रकरण सांगून सल्ला मागते. सगळया गावाला त्रासदायक (विशेषत: रामोशी वर्गाला) ठरणारे प्रकरण म्हणजे जगण्या व वांगीच्या उच्च घराण्यातील स्त्रीचे प्रकरण. हया प्रकरणात रामोश्याने आमच्यातली एक बाई काढून नेली हे काळे आमच्या तोंडाला लागले आहे. इथे वांगीकर लोकांच्या सामाजिक प्रतिष्ठेचा प्रश्न, तर जगण्या सापडला असता तर "आमी त्याच्या डोस्क्यात धोंडा घातला असता हा," त्यो हितं असता तर लाथा घालीत तुमापुढं आनला असता."[१५] यातून रामोशांची मराठयाबद्दलची भावना तर दिसून येतेच पण रामोशी समाजाला काळीमा लावणारा जगण्या त्यांना शत्रू वाटतो. कारण जगण्याचा पावणा म्हणतो-- "जगन्नातानी गोष्ट चुकीची केली. फार वरच्या पायरीला हात घातला. बाई न्याला हरकत नव्हती, पर निदान आपल्या जातीतली न्याची."[१६] इथे सामाजिक स्थराची कल्पना येते. म्हणजे प्रत्येक जातीने आपल्या आपल्या जातीतच ब-या वाईट गोष्टी कराव्या दुस-या जातीत ढवळाढवळ केली तर जगण्या सारखी अवस्था होते. शिवाय बाईची अब्रू गेल्याने तिला कुणी परत जातीत घेत नाहीत व तिचे नाक कापून, विद्रूप करून समाज तिला शासन करतो. शिवाय रामोशी समाज्यातही तिला कुणी ठेवून घेत नाही म्हणजे सामाजिक दृष्टया बाईची अब्रू म्हणजे काचेचे भांडे, त्याला एकवेळ तडा गेला तर ते जोडता येत नाही. धनगर समाजातही हीच प्रथा असल्याने मास्तर-अंजी, शेकू-अंजी या प्रकरणा-बद्दल गाव चिडतो.

शेकूची बायकोपण आपल्या नव-याला दोष देते व म्हणते "कारभारी गेला. चांगला हुता बिचारा. पर मरता मरता माज्या संसारात इस्तू टाकून गेला."[१७] शेकू जेव्हा सारखा अंजी मागून फिरु लागला व तीही तरण्या पोराला हुलकावण्या द्याव्यात तशा देऊ लागल्यावर शेकूची बायको म्हणते, "तिला एक अक्कल न्हाई.! - नसायलं काय झालं ? न्हानी धुती हाय आता.! --पर अब्रु न्हाई म्हना. पर हयेनी का तिच्या नादी लागावं ? जनाची न्हाई, मनाची तरी लाज पायजे."[१८] यावरुन कुणाच्याही वाळल्यापाचोळ्यावर पाय न देणारा शेकू अंजीमुळे बदनाम झाला. आपल्याकडे विश्वासाने सांभाळायला दिलेल्या मुलीबरोबर असले शृंगारचाळे धनगर समाजाला मान्य नाहीत. उलट कोकणात मात्र खोतांनी देवदासी ठेवणे, इतर अंगवस्त्रे बाळगणे थोरपणाचे मानले जाते. धनगर अडाणी असूनही त्यांच्या नीतीच्या कल्पना ठाम आहेत.

## थोरांबद्दल आदर:

आपल्या राजाच्याबद्दलच्या धनगरसमाजाच्या भावनापण तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. राजाची रथातून मिरवणूक काढतात. सनई-ताशा लावतात. सुवासिनी ओवाळतात. "राजा चिरायू होवो.!" अशा घोषणा देतात. बनगरवाडीत राजा येणं हेच अप्रुप. म्हणून धनगर लोक अंगावर नवी वस्त्रे परिधान करुन हजर राहतात. एवढेच नव्हे तर लंगडा झालेला दादू बालट्या म्हणतो "मला राजाला बगायला यायचं हाय रे. पाठकुळी घेऊन तिथपतूर चला कुणी."[१९] यातून त्याचे राजाबद्दलचे प्रेम दिसते. तसेच आयबू पण शुध्दीवर आल्यावर म्हणतो "मास्तर, राजा आला का ?" या त्याच्या प्रश्नात सुध्दा राजाबद्दलचे प्रेमच दिसून येते.[२०]

बनगरवाडीत दारिद्र्य इतके आहे की, मुले शाळेत गेली तर त्यांना पोटाला कुणी घालावं हा प्रश्न त्यांना पडतो. पेरणीला बैल मिळाला नाही म्हणून शेकूची बायको जनावरासारखे औत ओढते. त्यांचे दोन वेळचे जेवण-सुध्दा भाजीपाला, कांदा किंवा चिमूटभर चटणी किंवा मिठाशी असते. जन्मल्यापासून मरेपर्यंत फक्त मेंढरे राखणे हेच त्यांचे जीवित कर्तव्य असते. ते एखाद्यावर विश्वास टाकला कि शंका घेत नाहीत. म्हणूनच मास्तर जक्क बिनधोकपणे पैसे बदलून आणायला देतात. संघिकरित्या तालमीचे काम करतात. सामुदायिक कामात विरोध करणारा बाळा धनगराला ते वाळीतही टाकतात. व माफी मागितल्यावर परत जातीत ही घेतात. आयबु बेशुध्द पडला तरीही तालमीचे पेंड टाकण्याचे काम धनगर थांबवित नाहीत.

तसेच आनंदा रामोशी मास्तरांचे पैसे, भाकरीचे गाठोडे समजून पळवितो पण परत आणून देतो तेव्हा म्हणतो "मोजून बगा, मी तीन रुपये धा आने खाऊन बसलोय ते काय माघारी देनार न्हाई पर बाकी तुमचं सगळं रुपयं तसंच हायेत।" [२१] या त्याच्या उद्‌गारातून त्याचा प्रामाणिकपणा दिसतो. शिवाय दादू बालटयाला शिक्षकाच्या प्रेमापोटी मारणारा हाच आनंदा असतो.

रामोशी समाजाला मागून कुणी काही देत नसल्याने त्यांना चोरी करावी लागते. तर धनगर मात्र चोरी करण्याच्या फंदात पडत नाहीत. ही माणसे श्रध्दाळू असल्याने देव त्यांच्या स्वप्नात येऊन दृष्टांत देतात. त्यांच्या अंगात येतात. व भविष्यवाणी वर्तवितात. सारा समाज त्यानुसार वर्तन करायला लागतो--

एकंदरीत प्रादेशिक कादंबरीत भौगोलिक-नैसर्गिक पार्श्वभूमी आणि

सामाजिक पार्श्वभूमी यांची एकसमता साधणे महत्त्वाचे असते. सामाजिक पार्श्वभूमीचे तपशीलाने वर्णन येणे ही गोष्ट प्रादेशिक कादंबरीत महत्त्वाची ठरते. अशा वातावरणाच्या चित्रणातून अभावितपणे विषादाचा सूरही उमटतो. दैन्य दारिद्रय यामुळे कारुण्याची छटा या प्रदेश जीवनावर आलेली आढळते. ग्रामीण जीवनात अनेक समस्या असतात. जातीभेद, वर्णभेद, वर्गभेद आणि ग्रामीण बलुतेदारीच्या प्रथा, शेती व्यवसाय व तदंतर्गत व्यक्तींचे परस्पर संबंध यातून ग्राम जीवनात सामंजस्य व तणाव निर्माण होतात. खेड्याचे खेडेपण संपत आल्याचे दु:खही या वर्णनातून जाणवत असते. उदा. माडगूळकरांची "सर्व्हिस मोटार" कथा, 'गोताळा', 'पडघवली', 'गांधारी', 'पाचोळा', इ. कादंब-यातून व कथांतून ग्रामपंचायती, सहकारी सोसायटी, गटविकास योजना, पंचायत समिती, जिल्हा परिषद यामुळे एक गट सत्ता गाजविणारा व प्रभाव पाडणारा तर दुसरा अंकीत जीवन जगणारा, दबलेला दिसतो. परंतु "बनगरवाडी"त या आधुनिक युगाच्या वा-याचा स्पर्शही झालेला नाही. त्यामुळे अस्सल प्रादेशिकपणा आपणास 'बनगरवाडीतच पहायला मिळतो. त्यांचा मेंढपाळीचा धंदा, त्याचं प्राथमिक पातळीवरचे जीवन, देवळापुढच्या अंधारातच त्यांच्या चर्चा, त्याही खांडाच्या, लांडग्यांच्या, लांडगा मारणा-या बहाद्दरांच्या. त्यांना शाळा, शिक्षण, तालीम यांची आवश्यकता माहीत नाही. बाहेरच्या जगाविषयी त्यांची अनभिज्ञता, राम्या धनगराचा म्हातारा उभ्या ७० वर्षात केवळ मेंढरे राखतो त्याला दुसरा धंदा, गाव, माहीत नाही त्याला कुत्र्याला यावा तसा लांडग्याचा वास येतो. राखणीला सावध बसून बसून तो झोपण्याचे विसरुनच गेला आहे. तो मेंढरे, त्यांची संतती ओळखतो तशीच ती जुळवितो. रामोशी भुरट्या-चो-या, दारु गाळणे या धंद्यावर जगतात व त्याचे एक तत्त्वज्ञान बनलेले आहे. किडामुंगी, राघू, कावळे धान्य खातात,

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्यांना कोणी विचारत नाही तसे आपणालाही कोणी विचारु नये. "वरवर दिसणाऱ्या सामान्य पातळीवर जीवन जगणाऱ्या या धनगरांच्या जीवनातील गुंतागुंत, आंदोलने, माडगूळकरांनी अत्यंत संवेदनशीलतेने टिपली आहेत. येथील समग्र जीवन, रीतीभाती, समजुती, परंपरा, स्त्री आणि त्यांचा निसर्गाशी चाललेला जीवनसंघर्ष, निसर्गाच्या चैतन्याने आनंदून जाणारी आणि दुष्काळाने कोमेजून जाणारी, पोटासाठी देशोधडी जाणारी, पिढयान पिढया या आवर्तात ती अशीच जगत आली आहेत"[२२] असे प्रा. मा.ना. कागदे लिहितात. व हे त्यांचे लिहिणे आता पर्यंत पाहिलेल्या, त्यांच्या नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनातून प्रत्ययाला आले आहे. माडगूळकर जेव्हा निसर्गवर्णन करतात तेव्हा ते ढोबळ वर्णन करीत नाहीत. त्यांच्या वर्णनात अचूकपणा व सूक्ष्मपणा असतो. शेतातल्या पिकावर कोणते पक्षी बसतात. जनावरांच्या पाठीवर कोणते पक्षी बसतात. यांची नावे ते देतात, "पैसा किडा" हा शब्दप्रयोग किंवा शेकूची बायको "गूंडा हात" ऊंच या ग्रामीण संज्ञा ते बरोबर लिहितात सुरवातीच्या वर्णनातील मुंग्या, टोळ, गुंडीकिडे, भुंगे, घोरपडी, होले, यांची हालचाल, व त्यांच्या पायांची धुळीवर उमटणारी नक्षी, धुळीचे वर्णन, पावसाचे वर्णन, दुष्काळाचे वर्णन अत्यंत प्रत्ययकारी केले आहे. याचे कारण माडगूळकरांनी रान पाहिले होते. त्यांचा शिकारीचा छंद, त्यांची चित्रकलेची आवड यामुळे त्याचे वर्णन जिवंत बनलेले आहे. 'बनगरवाडी'-तील शेळया-मेंढयाच्या मुताचा, लेंढयाचा वास संपूर्ण कादंबरीवर भरुन राहतो. माणसाच्या बसण्याच्या उठण्याच्या लकबी, त्यांच्या बोलण्याच्या लकबी यातून धनगरांचे विश्‍व त्यांनी साकारले आहे. तसेच धनगरांच्या श्रध्दा, अंधश्रध्दा, स्त्री यांच्या तपशीलवार वर्णनाने धनगरांचे जग ते सजग करतात. मावल्याआईच्या यात्रेचे वर्णन, लेझीम, ढोल यांचे आवाज यांच्या सूक्ष्म वर्णनातून माडगूळकर

"बनगरवाडी"चे चित्र अत्यंत रेखीवपणे उभे करतात. जणू बनगरवाडीच्या या चित्रणातून त्यांच्या सूक्ष्म चित्रणशैलीचा प्रत्यय येतो.

अशा प्रकारे या कादंबरीत ख-या खु-या अर्थाने प्रादेशिकता आहे हे सिध्द होते. कादंबरीची आशयसूत्रे प्रादेशिकतेतून व्यक्त होतात हेही दिसून येते.

सारांश "बनगरवाडी" पूर्व-कादंबरीकारांनी मित्र-मैत्रिणीच्या कथा रंगवून कादंबरीचे एकच सूत्र आजपर्यंत फिरत ठेवण्याचे काम केले. त्याच प्रमाणे फडके प्रणीत कादंबरी तंत्र सर्व कादंबरीतून वापरले. परंतु "बनगरवाडी" या कादंबरीत तीन सूत्रे आढळून आली. एक म्हणजे या वाडीतील शिक्षकाचे जीवन चित्रित करणे, दुसरे सूत्र बनगरवाडीचे सामाजिक जीवन रेखाटणे आणि तिसरे सूत्र म्हणजे "बनगरवाडीतील निसर्ग या तीन सूत्रातून माडगूळकरांनी "बनगरवाडी" उभी केली आहे. "बनगरवाडी"ची ही तीन आशयसूत्रे तिच्या प्रादेशिकतेच्या वैशिष्टयातूनच निर्माण होतात. या प्रकारचे चित्रण कादंबरीकाराने केले आहे. "बनगरवाडी"च्या उजाड वस्तीवर राजाराम विठ्ठल सौंदणीकर शिक्षक म्हणून जातो "बनगरवाडी"त चलन करुन निर्माण करतो. "बनगरवाडी"च्या जीवनाशी समरस होतो. गावच्या भल्यासाठी सतत झटत राहतो. गावाचे पान मास्तर शिवाय हालत नाही. अशा बनगरवाडी"त कारभारी सारखा सत्शील माणूस भेटतो तसेच बालटयासारखी दुष्ट प्रवृत्तीची माणसेही त्याला भेटतात. तरीही गावासाठी तो झटत राहतो. या "बनगरवाडी"तील मेंढपाळाचे जीवन तो न्याहाळतो. पोटासाठी मेंढपाळाचा धंदा करणा-या मेंढपाळांना मेंढरापेक्षा शाळेची किंमत वाटत नाही. एकमेकांच्या मदतीला ते धाऊन जातात. गावाच्या यात्रा, सण-वारात आनंद लुटतात. मेंढराची पैदास करणा-याला मेंढरे फुकटसुध्दा देतात. अशा या "बनगरवाडी"त

मानवी जीवन मात्र निसर्गाच्या तालावर चालते. सुगी येताच मेंढपाळ खुष होतात. गजीनृत्य, ढोलाच्यातालावर नाचतात, बागडतात. व दृष्काळ येताच पोटासाठी गाव सोडून देशोधडीला कसे जातात. याचेच चित्रण माडगूळकरांनी अतिशय बारकाईने केले आहे. अशा या "बनगरवाडी"त उन्हाळा, हिंवाळा हे दोनच ऋतू प्रमुख असतात. यंत्रदूर हा प्रदेश असल्याने अंधश्रध्दा, रूढी, जात-पात यांची बंधने ते पाळतात. गावाविरूध्द जाणाऱ्याला वाळीत टाकले जाते. इथे लग्ने ठरवून एकदमच उरकली जातात. इथे पंतसरकार-सारख्या लोकांबद्दल आदर बाळगला जातो. मावल्याआईच्या यात्रेत नवस फेडले जातात. केलेल्या चूकाना क्षमा दिली जाते. व फिरून "बनगरवाडी"चे जीवन आनंदमीय बनते.

.....

## संदर्भ


१. ल.ग. जोग – कादंबरी, "चिरंजीव ग्रंथ प्रकाशन", पुणे, पृ. ११५

२. प्रा.मा.ना.कागणे– "प्रतिष्ठान" – कादंबरी समीक्षा विशेषांक, जानेवारी, १९८१, पृ. २०.

३. अ.रा. तोरो – आधुनिक मराठी ललित वाङ्.मयातील प्रादेशिकता– उद्गम आणि विकास, अप्रकाशित, पृ. २३६.

४. "बनगरवाडी" – आवृत्ती १० मौज प्रकाशनगृह, मुंबई, पृ. ९०

५. तत्रैव – पृ. ८७

६. तत्रैव – पृ. ९२

७. तत्रैव – पृ. ९३/९४

८. तत्रैव – पृ. ३०

९. तत्रैव – पृ. ३१

१०. तत्रैव – पृ. ५

११. तत्रैव – पृ. ९७

१२. तत्रैव – पृ. ९७

१३. तत्रैव – पृ. १४

१४. तत्रैव – पृ. ९७

१५. तत्रैव – पृ. ७८

१६. "बनगरवाडी" - आवृत्ती १० मौज प्रकाशनगृह, मुंबई, पृ. ७९

१७. तत्रैव - पृ. ८६

१८. तत्रैव - पृ. ८६

१९. तत्रैव - पृ. ७४

२०. तत्रैव - पृ. ७४

२१. तत्रैव - पृ. ४३

२२. प्रा. मा.ना. कागणे- "प्रतिष्ठान"- कादंबरी समीक्षा विशेषांक, जानेवारी १९८१.

.....